सत्यमेव जयते

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २०२५
जिल्हा - यवतमाळ

कॉटन सिटी

दगडी कोळसा खाण, ता.वणी

सहस्त्रकुंड धबधबा, मुरली ता.उमरखेड

टिपेश्वर अभयारण्य, ता.केळापूर

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
मुंबई

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

२०२५

जिल्हा - यवतमाळ

अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महाराष्ट्र शासन,
मुंबई

- - : : - - <u>प्रस्तावना</u> - - : : - -

यवतमाळ जिल्ह्याच्या नियोजनासाठी, विकास कामासाठी व भविष्यातील विकासाचे अंदाज करण्यासाठी उपयोगी असणारी सांख्यिकीय आकडेवारी गोळा करुन 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २०२५' हे प्रकाशन पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर प्रकाशनातील आकडेवारी ही जिल्ह्याची स्थिती दर्शविणारी असल्याने या प्रकाशनाचा विद्यार्थ्यांना सुध्दा संदर्भाकरीता चांगला उपयोग होईल.

जिल्ह्यातील केंद्र पुरस्कृत योजना, राज्य शासनाच्या योजना, जिल्हा परिषदेकडील योजना, जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण, विशेष घटक योजना, आदिवासी उपयोजना इत्यादी राबविण्यासाठी या पुस्तिकेतील आकडेवारी ही अत्यंत उपयोगी पडेल, अशी माझी खात्री आहे.

सदर पुस्तिका मा. आयुक्त, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई व मा. सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, अमरावती यांच्या मार्गदर्शनानुसार पूर्ण करण्यात आली.

सर्व संबंधित यंत्रणांनी प्रकाशनाकरिता उपयुक्त माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळेच सदर प्रकाशन पूर्ण होऊ शकले. त्याकरीता मी, अर्थ व सांख्यिकी संचालनालयातर्फे सर्वांचा आभारी आहे. अशीच सहकार्याची अपेक्षा आहे.

म.शं.गेडाम
उपसंचालक,
जिल्हा सांख्यिकी कार्यालय,
यवतमाळ

अनुक्रमणिका

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २०२५

जिल्हा : यवतमाळ

तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्रमांक
	भाग १ - समालोचन	
	१. जिल्ह्याचा समग्र आढावा	१
	२. दृष्टीक्षेपात जिल्हा	१३
	३. जिल्हा योजनेचा आढावा	१९
	जिल्ह्याचा नकाशा	२१
	निवडक निर्देशांकावर आधारीत आलेख	२२
	भाग २ - सांख्यिकीय तक्ते	
१	**निवडक निर्देशक**	
१.१ (अ)	जिल्ह्यातील विविध सामाजिक व आर्थिक बाबींचे निवडक निर्देशक	२७
१.१ (ब)		२९
१.१ (क)		३३
१.२	जिल्ह्यातील महत्वाची सांख्यिकी	३७
२	**जिल्हा उत्पन्न अंदाज**	
२.१	क्षेत्रवार स्थूल जिल्हा उत्पन्न - चालू किंमतीनूसार	४०
२.२	क्षेत्रवार निव्वळ जिल्हा उत्पन्न - चालू किंमतीनूसार	४३
२.३	क्षेत्रवार स्थूल जिल्हा उत्पन्न - स्थिर (२०११-१२) किंमतीनूसार	४६
२.४	क्षेत्रवार निव्वळ जिल्हा उत्पन्न - स्थिर (२०११-१२) किंमतीनूसार	४९
३	**किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था**	
	किंमतीविषयक आकडेवारी	
३.१	जिल्ह्यातील महत्वाच्या वस्तुंच्या केंद्रनिहाय त्रैमासिक सरासरी किरकोळ किंमती	५२
	सार्वजनिक वितरण व्यवस्था	
३.२	रास्त भाव धान्य दुकाने, शिधापत्रिका धारकांची व गोदामाची संख्या	५४
३.३	अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबात मोडणा-या (अंत्योदय अन्न योजना वगळून) कुटुंबांसाठी अन्नधान्याचे नियतन व उचल	५६
४	**जमिन व इतर महसूल, स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न/खर्च, बँकींग, विमा, बचत गट**	
	जमिन व इतर महसूल	
४.१ (अ)	शासकीय कर व इतर यांची वसुली / थकबाकी {जमीन महसूल (सर्वसाधारण, वाढीव, संकिर्ण) सेस (उपकर- जि.प., ग्रा.पं., पं.स., इ.जी.एस.), शिक्षण कर, अकृषिक आकारणी, सिटी सर्वे (पोट हिस्सा फाळणी फी), वस्तीवाढ सनद फी, अंतर्गत लेखा परिक्षण वसुली व नझूल बाकी}	५७
४.१ (ब)	शासकीय कर व इतर यांची वसुली / थकबाकी (खाणी, गौण खनिज रॉयल्टी, मत्स्यव्यवसाय कर, कोर्ट फी व मुद्रांक शुल्क, नोंदणीपत्र फी, बीएडीआर व बीबीआर कायद्यानुसार मिळणा-या रकमा, महसूल प्रमाणपत्राव्दारे होणारी वसूली, करमणूक, जाहिरात कर इत्यादी)	५८
४.१ (क)	शासकीय कर व इतर यांची वसुली / थकबाकी (सर्व साधारण तगाई, मृद संधारण थकबाकी, वन जमीनीवरील भुमिहीन शेतमजुरांना पुनर्वसनासाठी दिलेले कर्ज, अकृषीक कर्ज, आदर्श गृहनिर्माण कर्ज, इतर देशाकडून आलेल्या निर्वासितांना दिलेली कर्जे, प्रकल्पग्रस्तांना व कुळांना दिलेले कर्ज, नैसर्गिक आपत्ती कर्ज, जमिन सुधारणा-कब्जेहक्क किंमती इत्यादी)	५९

तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्रमांक
	स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न/ खर्च	
४.२	नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे २०२४-२५ मधील उत्पन्न व खर्च	६०
४.३	ग्रामपंचायतींचे उत्पन्न व खर्च	६१
४.४	जिल्हा परिषदचे उत्पन्न व खर्च	६२
	बँक क्षेत्र	
४.५	तालुकानिहाय बँक कार्यालये, वर्गीकृत बँकांची संख्या, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा, ठेवी व कर्जे	६३
	बचत गट	
४.६	जिल्ह्यातील बचत गटांबाबतची माहिती	६५
५	**कृषी व संलग्न सेवा**	
	कृषी	
५.१	जमिनीच्या वापराविषयी माहिती	७०
५.२	निरनिराळ्या पिकांखालील क्षेत्र	७२
५.३	जिल्ह्यात वितरीत करण्यात आलेले बियाणे	८७
५.४	रासायनिक खतांचा वापर	८८
५.५	निरनिराळ्या पिकांची प्रति हेक्टरी उत्पादकता	९०
५.६	मुख्य पिकांचे दर हेक्टरी अंदाजित उत्पादन	९४
५.७	तालुकानिहाय पर्जन्य दिवसांची संख्या व एकूण पर्जन्य	९६
	पदुम	
५.८	कृत्रिम रेतन व दुग्ध उत्पादनाची तालुकानिहाय प्रगती	९७
५.९	पशुवैद्यकिय संस्थांबाबतची माहिती	९९
५.१०	भूजल मत्स्यव्यवसाय विषयक माहिती	१००
५.११	सागरी मत्स्यव्यवसाय विषयक माहिती	१०१
५.१२	शासकीय आणि सहकारी दुग्ध शाळांमधील दुग्ध उपउत्पादने	१०२
५.१३	दुग्ध विकास सहकारी संस्थांबाबतची माहिती	१०३
	जलसंपदा व लाभक्षेत्र	
५.१४	जिल्ह्यातील सिंचनाच्या व पाणी उपसा करण्याच्या सोयी	१०४
५.१५	विविध साधनांखालील ओलिताचे क्षेत्र	१०५
५.१६	सिंचन विहिरीविषयक माहिती	तक्ता वगळण्यात आला आहे.
५.१७	कुपनलिका, हातपंप व विद्युत पंपांविषयी माहिती	१०६
५.१८	जिल्ह्यातील पाटबंधारे विषयक सुविधा (राज्यस्तर पाटबंधारे)	१०७
५.१९	जिल्ह्यातील लघुपाटबंधा-यांच्या कामाविषयक माहिती	१०८
५.२०	मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पांविषयी माहिती	११०
५.२१	जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मृद व जलसंधारण कामांची प्रगती	११३
५.२२	जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानाबाबतची माहिती	११५
	वने व पर्यावरण	
५.२३	जिल्ह्यातील एकूण वनक्षेत्र	११७
५.२४	जिल्ह्यातील वनांचे वर्गीकरण	११८
५.२५	सामाजिक वनीकरण कार्यक्रमांतर्गत वृक्षरोपणाचे लक्ष्य व साध्य	११९
५.२६	वन्यजीव व राष्ट्रीय उद्याने/ अभयारण्याअंतर्गत प्रकल्पनिहाय क्षेत्र व खर्च	१२१
५.२७	मुख्य व गौण वन उत्पादने व उत्पन्नाविषयी माहिती	१२२
५.२८	संवर्गनिहाय कारखान्यांचा तपशील	१२३

तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्रमांक
६	**उद्योग, रोजगार व स्वयंरोजगार, कामगार व सहकार**	
	उद्योग	
६.१	जिल्ह्यातील उद्योगांबाबतचा तपशील	१२४
६.१ (अ)	जिल्ह्यातील तालुकानिहाय उद्योग आधार असलेले सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची माहिती	१२७
६.२	जिल्ह्यातील विविध यंत्रणांकडे उपलब्ध असलेल्या स्वयंरोजगाराच्या योजनांतर्गत लाभ दिलेल्या लाभधारकांची संख्या	१२८
	रोजगार व स्वयंरोजगार	
६.३	कारखान्यातील कामगारांची दैनिक सरासरी संख्या	१२९
६.४	कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राबाबतची सांख्यिकी	१३०
६.५	शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष अंतर्गत शासकीय कर्मचाऱ्यांची संख्या (अस्थायी)	१३१
६.६	निरनिराळ्या उद्योगांतील रोजगारांबाबतची माहिती	१३२
	कामगार	
६.७	दुकाने, व्यापारी संस्था व त्यातील कामगारांबाबतची माहिती	१३३
	सहकार	
६.८	प्राथमिक कृषि सहकारी संस्थांचा तपशील	१३४
६.९	प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांचा तपशील	१३७
६.१०	जिल्ह्यातील साखर कारखाने विषयक माहिती	१३८
६.११	विविध प्रकारच्या सहकारी संस्थांचा तपशील	१४०
६.१२	सहकारी संस्थांची लेखापरीक्षण वर्गाप्रमाणे संख्या	१४२
६.१३	जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या सहकारी बँकाचे कार्य	१४३
६.१४	बिगर-कृषी सहकारी पतसंस्थांचे कार्य	१४४
६.१५	परवानाधारक सावकारांची संख्या आणि त्यांनी दिलेली कर्जे	१४५
	पणन	
६.१६	जिल्हा आणि प्राथमिक पणन संस्थांचे कार्य	१४६
६.१७	नियंत्रित बाजारपेठांतील कृषी मालांची वार्षिक आवक	१४७
६.१८	निवडक कृषि मालाच्या त्रैमासिक सरासरी घाऊक किमंती	१५०
	वस्त्रोद्योग	
६.१९	सहकारी सूत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग यांचा तपशील	१५१
७	**पायाभूत सुविधा**	
	ऊर्जा	
७.१	जिल्ह्यातील विजेचा वापर	१५३
	प्रादेशिक परिवहन, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन व दळणवळण	
७.२	मोटार वाहनांची आणि अनुज्ञाप्ती धारकांची संख्या	१५४
७.२ (अ)	अनुज्ञाप्ती धारकांची संख्या	१५५
७.३	महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची प्रवासी वाहतूक	१५६
७.४	स्थानिक स्वराज्य संस्थांचे वाहतूक उपक्रम	१५७
७.५	पोस्ट आणि दूरध्वनी सेवा यांची आकडेवारी	१५८
	सार्वजनिक बांधकाम	
७.६	प्रकार व पृष्ठभाग यानुसार रस्त्यांची लांबी	१५९
७.७	जिल्ह्यातील रस्ते विकास कार्यक्रमाची प्रगती	१६०
७.८	तालुक्यातील रस्तेविषयक आकडेवारी (आदिवासी + बिगर आदिवासी क्षेत्र)	१६१

तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्रमांक
	पाणी पुरवठा व स्वच्छता	
७.९	पिण्याच्या पाण्याच्या सोयी व टंचाई संबंधी केलेल्या उपाययोजना	१६३
७.१०	अनुसूचित जाती व नवबौध्द वैयक्तिक नळजोडणी	१६५
७.११	ग्रामीण भागात शौचालयाची सुविधा असणा-या कुटुंबांची संख्या	१६६
८	**सामाजिक क्षेत्रे व सामूहिक सेवा**	
	शिक्षण	
८.१	जिल्ह्यातील प्राथमिक शाळांबाबतची माहिती	१६७
८.२	जिल्ह्यातील माध्यमिक शाळांबाबतची माहिती	१७०
८.३	जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शाळांबाबतची माहिती	१७३
८.४	शैक्षणिक संस्थांतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची संख्या	१७६
८.५	शैक्षणिक संस्थांतील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची संख्या	१७८
८.६	शैक्षणिक संस्थांतील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची संख्या	१८०
८.७	जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण	१८२
८.८	इयत्तानिहाय विद्यार्थी संख्या	१८४
८.९	प्राथमिक शाळांतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या	१८६
८.१०	प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण	१८७
८.११	शारिरीक शिक्षण महाविद्यालये, क्रीडांगणे, क्रीडा संस्था आणि क्रीडा शिष्यवृत्तीधारक याबाबतची माहिती	१८८
८.१२	इयत्ता दहावी नंतर विविध क्षेत्रातील संस्था संख्या, उपलब्ध प्रवेश क्षमता व प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या	१९०
८.१३	जिल्ह्यातील महाविद्यालयांबाबतची माहिती	१९४
८.१४	व्यावसायिक शिक्षण संस्थांबाबतची माहिती	१९६
	सार्वजनिक आरोग्य	
८.१५	सार्वजनिक व शासन सहाय्यीत वैद्यकीय सुविधांची माहिती	१९८
८.१५ (अ)	कोविड-१९ बाधित रुग्णांसाठी उपलब्ध उपचार सुविधा	२००
८.१६	खाजगी वैद्यकीय सुविधांची माहिती	२०१
८.१७	जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली अंतर्गत जन्म व मृत्यूंची संख्या	२०२
८.१८	प्रसुतीपूर्व तपासणींची संख्या	२०४
८.१९	विविध कारणांनुसार मृत्यूची संख्या	२०५
८.२०	माता व बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत लस टोचणी	२०६
८.२१	कुटुंब कल्याण कार्यक्रमाची प्रगती	२०८
	महिला व बालविकास	
८.२२	जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाड्या, कार्यरत सेविका व अंगणवाड्या इमारतींचा तपशिल	२१०
८.२३	जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाड्या व त्यामधील बालके	२१२
८.२४	जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाड्यांमधील कुपोषीत बालकांचे श्रेणीनिहाय वर्गीकरण	२१४
८.२५	एकात्मिक बाल विकास योजना - माता व बालसंगोपन	२१६
	गृहनिर्माण	
८.२६	सिडकोने/ म्हाडाने बांधलेल्या घरांचा तपशिल	२१८
८.२७	प्रधानमंत्री आवास योजना	२१९
८.२८	घरबांधणीसाठी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत ग्रामीण क्षेत्रात दिलेली घरे	२२१

तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्रमांक
	सामाजिक न्याय	
८.२९	जिल्ह्यातील मागासवर्गीय वसतीगृहे, त्यांची प्रवेश क्षमता व दिलेले प्रवेश	२२५
८.३०	जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द वस्त्या, त्यामधील लोकसंख्या व अनुसूचित जाती व नवबौध्द वस्त्यांची सुधारणा	२२७
	अल्पसंख्यांक विकास	
८.३१	अल्पसंख्यांक विकास विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांमधील लाभार्थी संख्या	२२९
	विशेष सहाय्य	
८.३२	महसुल विभागाकडील सामाजिक सुरक्षा योजनांअंतर्गत केलेले अर्थसहाय्याबाबतची माहिती	२३०
८.३३	संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत केलेले अर्थसहाय्याबाबतची माहिती	२३१
	मदत व पुनर्वसन	
८.३४	पुनर्वसन प्रकल्पांची सद्य:स्थिती	२३२
८.३५	जिल्ह्यातील दुष्काळामुळे झालेली हानी व पुनर्वसन व्यवस्थापनांतर्गत दिलेले सहाय्य	२३३
८.३६	जिल्ह्यातील आपत्तीमुळे झालेली हानी व आपत्ती व्यवस्थापनांतर्गत दिलेले सहाय्य	२३४
९	**योजनाविषयक आकडेवारी, ग्रामीण रोजगार हमी योजना**	
	विविध विकास योजना	
९.१	जिल्हा नियोजन समितीअंतर्गत विविध योजनांतर्गत नियतव्यय,प्राप्त निधी व खर्चाचा आढावा	२३५
९.२	विविध विकास शीर्षाखाली झालेला योजनांतर्गत खर्च	२३६
९.३	वीस कलमी कार्यक्रमाची भौतिक प्रगती	२३९
९.४	केंद्र शासनाच्या महत्वपुर्ण योजनांची प्रगती	२४१
९.५ (अ)	खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम (लोकसभा मतदार संघ)-(I) १७वी लोकसभा	२४३
९.५ (ब)	खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम (लोकसभा मतदार संघ)-(II) १८ वी लोकसभा	२४४
९.५ (क)	खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम (राज्यसभा सदस्य)-(I) राज्यसभा मागील वर्ष	२४५
९.५ (ड)	खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम (राज्यसभा सदस्य)-(II) राज्यसभा अहवाल वर्ष	२४६
९.६	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (विधानसभा मतदार संघ)	२४७
९.७	स्थानिक विकास कार्यक्रम (विधानपरिषद सदस्य)	२४९
	महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना	
९.८	महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेची जिल्ह्यातील प्रगती	२५२
९.९	महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत दिलेला रोजगार	२५३
९.१०	महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेतलेली कामे, त्यावरील रोजगार व खर्च	२५५
९.११	महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेली प्रकारानुसार कामे व त्यावरील खर्च	२५६
१०	**संकीर्ण**	
	न्याय व प्रशासन	
१०.१	पोलिस अधिकारी/ कर्मचारी यांची संख्या	२५७
१०.१ (अ)	अत्याचार झालेल्या महिलांबाबत नोंदविलेल्या गुन्ह्यांची संख्या	२५८
१०.१ (ब)	अत्याचार झालेल्या बालकांबाबत नोंदविलेल्या गुन्ह्यांची संख्या	२५९
१०.२	जिल्ह्यात कार्यरत विविध न्यायालये, त्यामधील न्यायाधीशांची संख्या व निकालात काढलेली प्रकरणे	२६०

तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्रमांक
	माहिती व जनसंपर्क	
१०.३	जिल्ह्यात प्रकाशित झालेली वर्तमानपत्रे व नियतकालिके	२६१
१०.४	चित्रपट गृहे, व्ही.डी.ओ. केंद्र आणि केबलधारक यांची आकडेवारी	२६२
	निवडणुकीबाबत	
१०.५	लोकसभा निवडणूकीबाबतची आकडेवारी	२६३
१०.५(अ)	विधानसभा निवडणूकीबाबतची आकडेवारी	२६४
	वित्त	
१०.६	जिल्ह्यात गोळा करण्यात आलेला कर महसूल	२६६
१०.७	जिल्ह्यात गोळा करण्यात आलेला कायदेनिहाय जमा महसूल (मूल्यवर्धित कर आणि वस्तू व सेवा कर)	२६७
१०.८	कोषागारात सादर झालेल्या देयकांचे तपशिल	२६८
	पर्यटन	
१०.९	जिल्ह्यातील पर्यटन स्थळाच्या विकासाबाबत सद्यस्थिती	२६९
११	**गणना विषयक आकडेवारी**	
	जनगणना (लोकसंख्या)	
११.१	लोकसंख्या विषयक निवडक आकडेवारी	२७१
११.२	जिल्ह्यातील मागासवर्गीयांची लोकसंख्या	२७३
११.३	लोकसंख्या आणि वृद्धिदर	२७४
११.४	शहरांची वर्गवारी आणि त्यांची लोकसंख्या	२७५
११.५	मुख्य व सीमांतीक काम करणा-यांचे उद्योग गटनिहाय वर्गीकरण	२७६
११.६	धर्म व वयोगटानुसार लोकसंख्या	२७८
	कृषी गणना	
११.७	वहिती धारणेचा प्रकार आणि क्षेत्रफळ गटानुसार वर्गीकरण	२७९
	पशुगणना	
११.८ (अ)	जिल्ह्यातील पशुधन (विदेशी / संकरित गाई व बैल)	२८०
११.८ (ब)	जिल्ह्यातील पशुधन (म्हशी व रेडे)	२८५
११.८ (क)	जिल्ह्यातील एकूण पशुधन	२८७
११.८ (ड)	जिल्ह्यातील एकूण कुक्कुटपक्षी	२८८
	आर्थिक गणना	
११.९	कृषी व बिगर-कृषी उद्योग	२८९
११.१०	ढोबळ कार्यस्थितीनुसार आस्थापनांची आणि नियमित काम करणा-या कामगारांची संख्या	२९०
जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण घडामोडी		२९१

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २०२५

भाग १ :

समालोचन

जिल्ह्याचा समग्र आढावा
जिल्हा - यवतमाळ

(१) स्थानिक व भौगोलिक वैशिष्ट्ये

भौगोलिक स्थान

यवतमाळ जिल्हा उत्तर अक्षांश १९°२६[1]- २०°४२[1] आणि पूर्व रेखांश ७७°१८[1]- ७९°९८[1] या दरम्यान वसलेला आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस अमरावती जिल्हा, पश्चिमेस वाशिम, पूर्वेस चंद्रपुर आणि दक्षिणेस नांदेड जिल्हा आहे. यवतमाळ जिल्ह्याचे क्षेत्र विस्तृत असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने अमरावती विभागातील सर्वात मोठा जिल्हा असून महाराष्ट्रातील ६ वा मोठा जिल्हा आहे. यवतमाळ जिल्ह्यास पूर्वेला व दक्षिणेला नैसर्गिक सीमा प्राप्त झाल्या आहेत. वर्धा नदीमुळे वर्धा व चंद्रपुर जिल्हा पूर्व दिशेला आणि दक्षिणेस पैनगंगा नदीमुळे नांदेड जिल्हा यवतमाळ जिल्ह्यापासून वेगळा झाला आहे.

क्षेत्र व प्रशासकीय विभाग

यवतमाळ जिल्ह्याचे क्षेत्रफळ जनगणना २०११ नुसार १३५८२ चौ.कि.मी. असून महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी हा भूभाग ४.४ टक्के आहे. यवतमाळ जिल्हा दारव्हा, पुसद, वणी, यवतमाळ, केळापूर, उमरखेड व राळेगाव अशा एकूण सात राजस्व उपविभागामध्ये विभागलेला आहे. १ मे, १९८१ पासून केलेल्या तालुक्यांच्या पुनर्रचनेनुसार नवनिर्मित नऊ तालुक्यासह दारव्हा, यवतमाळ, पुसद, केळापुर, दिग्रस, वणी, नेर, बाभुळगाव, महागाव, उमरखेड, राळेगाव, घाटंजी, मारेगाव व कळंब असे एकूण चौदा तालुके होते. त्यानंतर १५ ऑगष्ट १९९२ पासून झरी जामणी व आर्णी या दोन नवीन तालुक्याची निर्मिती करण्यात आली. अशा प्रकारे यवतमाळ जिल्ह्यातील तालुक्यांची संख्या १६ झाली आहे. नवनिर्मित झरी जामणी तालुक्यामध्ये मारेगाव आणि केळापूर (पांढरकवडा) तालुक्यातील काही गावांचा समावेश केला आहे. तर आर्णी या नवीन तालुक्यामध्ये दिग्रस आणि घाटंजी तालुक्यातील काही गावांचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्याचे मुख्यालय यवतमाळ येथे असून विभागीय मुख्यालय अमरावती येथे आहे.

लोकसंख्या

२००१ च्या जनगणनेनुसार, यवतमाळ तालुक्यातील वडगाव रोड व वाघापूर आणि उमरखेड तालुक्यातील वसंतनगर या तीन नवीन नागरी विभागाचा (Census Town) समावेश करण्यात आल्यामुळे शहरांची एकूण संख्या १३ झाली होती. २००१ च्या जनगणनेनुसार एकूण गावे २१३० असून त्यापैकी २७४ गावे ओसाड होती. तसेच यवतमाळ जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २४५८२७१ होती.

२०११ च्या जनगणनेनुसार, एकूण गावे २१३७ असून त्यामधील २८४ गावे ओसाड आहेत. यवतमाळ जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २७७२३४८ आहे. २०११ च्या जनगणनेत नेर, पिंपळगाव, लोहारा, यवतमाळ ग्रामीण व देवगिरी ता. दारव्हा या पाच नवीन नागरी विभागाचा समावेश करण्यात आल्यामुळे शहरांची एकूण संख्या १८ झाली आहे. वसंतनगर ता. उमरखेड हा नागरी विभाग रद्द होऊन त्याऐवजी श्रीरामपूर, ता. पुसद या नागरी विभागाचा समावेश करण्यात आला आहे.

वैधानिक संस्था

यवतमाळ जिल्ह्यामध्ये एकूण १० नगर परिषद असून मारेगाव, महागाव, झरी जामणी, राळेगाव, कळंब, बाभुळगाव व ढाणकी येथे नगर पंचायती आहेत.

प्राकृतिक वैशिष्ट्ये

यवतमाळ जिल्हा अजिंठा पर्वताच्या रांगांनी उत्तर दिशेला घेरलेला आहे. पैनगंगा, वर्धा व त्यांच्या उपनद्यांमुळे तसेच मोठमोठ्या द-यांमुळे अजिंठा पर्वताच्या रांगा वेगवेगळ्या झालेल्या आहेत. जिल्ह्याच्या मध्य भागामध्ये उत्तुंग असे उंच घाट असून समुद्रसपाटीपासून या घाटांची उंची ३०० ते ५०० मीटर आहे. जिल्ह्यातील बहुतांशी जमीन चांगल्या प्रतीची असून जमिनीचा पोत काळा व गर्द-करडा आहे. जिल्ह्याच्या काही भागातील जमीन चुनखडी व वाळूमिश्रीत आहे. सर्वसामान्यपणे नद्यांच्या काठावरील जमीन अधिक सुपीक असून दारव्हा व पुसद तालुक्याचा मध्यभाग सुध्दा सुपीक आहे.

भूगर्भशास्त्रीय रचना

जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने चुनखडी व कोळसा हे दोन महत्वाचे खनिज पदार्थ आढळतात. सिमेंटकरिता उपयोगात येणारी चुनखडी वणी तालुक्यामधील चणाखा गावाच्या सभोवताली आढळते. तर दगडी कोळसा वणी तालुक्यामधील राजुर या गावाच्या आसपास विपुल प्रमाणात आढळतो.

नद्यांची रचना

जिल्ह्यामध्ये वर्धा व पैनगंगा या प्रमुख नद्या आहेत. या दोन्ही नद्या जिल्ह्याच्या अनुक्रमे ईशान्य व दक्षिण सिमेवरुन वाहतात. जिल्ह्याच्या मध्यभागातून वाहणा-या उपनद्या वर्धा व पैनगंगा नद्यांना मिळतात. वर्धा नदी रुंदीला अधिक असून खोल आहे. नदीकाठावरील गावांना बरेचदा वर्धा नदीच्या पूरामुळे नुकसान सोसावे लागते. वर्धा नदीच्या बेंबळा व निरगुंडा या दोन प्रमुख उपनद्या आहेत. त्यापैकी निरगुंडा नदी पुर्णतः वणी तालुक्यामधून वाहते. तर बेंबळा बाभूळगाव तालुक्याच्या उत्तरेकडून घाटांच्या पायथ्याशी वाहते. पैनगंगा नदीला सहा प्रमुख उपनद्या असून त्या पुस, अरुणावती, अडाण, वाघाडी, खुनी व विदर्भा या नावाने ओळखल्या जातात. पुस नदी पुसद व महागाव या तालुक्यामधून, अरुणावती नदी दिग्रस व आर्णी तालुक्यामधून तर विदर्भा नदी वणी तालुक्यामधून वाहते.

हवामान व पर्जन्यमान

या जिल्ह्याचे हवामान विषम असून सर्वसाधारणतः उष्ण व कोरडे आहे. हिवाळ्यामध्ये तापमान फारच कमी तर उन्हाळयात जास्त असते. उन्हाळा व हिवाळा हे ऋतू येथे तीव्रतेने जाणवतात. वर्षभरात अनेकदा एकाच दिवशी तापमानात बराच चढ उतार होत असतो. या जिल्ह्यात मान्सुनमुळे जून ते सप्टेंबर या महिन्यात पाऊस पडतो. पावसाचे प्रमाण जिल्ह्याचे सर्व भागात दरवर्षी सारख्याच प्रमाणात नसून त्यात बरीच तफावत आढळते. साधारणत: जुलै व ऑगष्ट या दोन महिन्यात पावसाचे प्रमाण जास्त असते. सन २०२४ या वर्षात जिल्ह्यात सर्वाधीक पाऊस आर्णी तालुक्यात ११४८.१ मि.मी. झाला असून सर्वात कमी उमरखेड तालुक्यात ७६९.१ मि.मी. पाऊस झाला आहे.

जमीन

साधारणत: यवतमाळ जिल्हा तीन नैसर्गिक विभागामध्ये विभागलेला आहे.

१) उत्तरेकडील वर्धा - बेंबळा नदीचे खोरे
२) मध्य व नैऋत्य भागातील उंचीवरील पठारे
३) पैनगंगा - पूस नदीखो-यातील (दक्षिणेकडील) सखल सुपीक जमीन

यवतमाळ जिल्ह्यातील बहुतेक जमीन सर्वसाधारण चांगल्या प्रतीची आहे. जमीनीचा पोत काळा व गर्द करडा आहे. या जिल्ह्याची जमीन चांगल्या प्रतीमध्ये मोडत असली तरी तुलनात्मकदृष्टया अकोला व अमरावती जिल्ह्याच्या जमीनीपेक्षा कमी प्रतीची आहे. या जिल्ह्याच्या जमिनीमध्ये चुनखडीचे मिश्रण असून जमीन उताराची आहे. याशिवाय जमिनीमध्ये रेतीचे प्रमाण देखील अधिक आहे. जिल्ह्यातील जमिनीत चुनखडी व रेतीचे प्रमाण असतांना देखील जिल्ह्यामधून वाहत असलेल्या नदीकाठच्या भागातील जमीन व उंचीवरील सपाट प्रदेश नदीच्या पुराने वाहून आलेल्या गाळाने अधिक सुपीक बनलेला आहे. वणी, मारेगाव तालुक्यामध्ये जमीन एकसारखी असून हलक्या प्रतीची व रंगाने लालसर आहे. राळेगाव, घाटंजी, यवतमाळ, पुसद, महागाव आणि उमरखेड या तालुक्यामधील डोंगराळ भागातील जमीन निकृष्ट प्रतीची, वाळूमिश्रीत व भुसभूशीत आहे. तिचा रंग तपकीरी व फिकट आहे. जिल्ह्यामध्ये उत्तम प्रतीची जमीन यवतमाळ, कळंब, बाभूळगाव तालुक्याच्या उत्तरेकडील भागात तसेच दारव्हा, दिग्रस, पुसद, उमरखेड आणि महागाव तालुक्यामधील मध्यभागात सर्वसाधारणपणे आढळते. ही जमीन नद्यांनी वाहून आणलेल्या गाळाने अधिक उत्तम व सुपीक बनलेली आहे.

(२) लोकसंख्या

लोकसंख्या

२००१ च्या जनगणनेनुसार, यवतमाळ जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २४५८२७१ होती. त्यात ५१.४८ टक्के पुरुष व ४८.५२ टक्के स्त्रियांचा समावेश होता. ८१.४० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागातील व १८.६० टक्के लोकसंख्या नागरी भागातील होती. १९९१-२००१ दशवर्षातील लोकसंख्या वाढीचे प्रमाण (+)१८.३५ टक्के होते. हे प्रमाण १९८१-१९९१ या दशवर्षातील वाढीच्या दरापेक्षा कमी होते. यावरून यवतमाळ जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा दर हळूहळू घटत असल्याचे दिसून येत होते.

२०११ च्या जनगणनेनुसार, यवतमाळ जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २७७२३४८ आहे. त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या १४१९९६५ असून टक्केवारी ५१.२२ आहे. स्त्रियांची लोकसंख्या १३५२३८३ असून टक्केवारी ४८.७८ आहे. ७८.४२ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागातील असून २१.५८ टक्के लोकसंख्या नागरी भागातील आहे.

लोकसंख्येची घनता

२०११ च्या जनगणनेनुसार, यवतमाळ जिल्ह्यातील लोकसंख्येच्या घनतेचे प्रमाण दर चौ.कि.मी. ला २०४ आहे. नागरी व ग्रामीण क्षेत्रातील लोकसंख्येच्या घनतेचे प्रमाण दर चौ.कि.मी. ला अनुक्रमे ३५८४ व १६२ एवढे आहे. २००१ ला जिल्ह्याचे हेच प्रमाण १८१ होते. २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या घनतेचे दर चौ. कि.मी. चे प्रमाण यवतमाळ तालुक्यामध्ये सर्वाधीक म्हणजे ३१५ आहे. यवतमाळ व उमरसरा नागरी भागात नवीन वस्ती निर्माण होऊन अनेक कुटुंबे राहण्यासाठी आल्याने यवतमाळ तालुक्यातील घनतेचे प्रमाण इतर तालुक्यापेक्षा जास्त दिसून येते.

ग्रामीण व नागरी लोकसंख्येचे प्रमाण

२०११ च्या जनगणनेनुसार, यवतमाळ जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ७८.४२ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागातील असून २१.५८ टक्के लोकसंख्या नागरी भागातील आहे. नागरी लोकसंख्या यवतमाळ, पांढरकवडा, घाटंजी, वणी, पूसद, उमरखेड, दारव्हा, दिग्रस व नेर या नऊ शहरात आणिवडगाव रोड, वाघापूर, पिंपळगाव, लोहारा, यवतमाळ ग्रामीण, देवगिरी, श्रीरामपूर, उमरसरा व राजूर या नागरी भागात विखुरलेली आहे. सर्वात जास्त नागरी लोकसंख्या यवतमाळ तालुक्यामधील यवतमाळ, यवतमाळ ग्रामीण, लोहारा, पिंपळगाव, उमरसरा, वडगाव रोड व वाघापूर या शहरांची/नागरी गावांची असून ती जिल्ह्याच्या नागरी लोकसंख्येच्या ३९.७३ टक्के आहे. तर सर्वात कमी लोकसंख्या घाटंजी या शहराची असून त्याचे प्रमाण जिल्ह्याचे नागरी लोकसंख्येच्या ३.५६ टक्के आहे. जिल्ह्यातील कळंब, बाभुळगाव, आर्णी, राळेगाव, मारेगाव, झरी जामणी, महागाव या तालुक्यामध्ये संपूर्ण लोकसंख्या ग्रामीण असून त्या तालुक्यामध्ये नागरी लोकसंख्या नाही.

आर्णी नगर परिषदेची स्थापना दिनांक १६ ऑगस्ट, २०११ रोजी झाल्यामुळे आर्णीची गणना ही नागरी लोकसंख्येमध्ये करण्यात आलेली नाही.

स्त्री-पुरुष प्रमाण

२०११ च्या जनगणनेनुसार, जिल्ह्यातील दर हजारी पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९५२ इतके आढळून आले आहे. ग्रामीण भागासाठी दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९५० तर नागरी भागासाठी हेच प्रमाण ९६२ आहे.

अनुसूचित जाती व जमाती

२०११ च्या जनगणनेनुसार, जिल्ह्यातील अनुसूचित जातीचे जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येशी प्रमाण ११.८५ टक्के व अनुसूचित जमातीचे प्रमाण १८.५४ टक्के इतके आहे.

लोकसंख्या व मनुष्यबळ

२०११ च्या जनगणनेनुसार, जिल्ह्यातील एकूण काम करणा-यांची संख्या १३५५९९९ असून एकूण लोकसंख्येच्या ४८.९१ टक्के आहे. २००१ ते २०११ या दशकांमध्ये जिल्ह्यातील काम करणा-यांच्या संख्येत २१.१९ टक्के वाढ झालेली दिसून येते. जिल्ह्यातील एकूण काम करणा-यांपैकी २४.५९ टक्के शेतकरी व ५४.५५ टक्के शेतमजूर आहेत.

वयोगटानुसार लोकसंख्येचे वर्गीकरण

२०११ च्या जनगणनेनुसार, जिल्ह्यातील लोकसंख्येची वयोगटाप्रमाणे विभागणी केली असता, ० ते ६ वर्ष या वयोगटातील लोकसंख्या ३३०१८० असून त्यावरील वयोगटातील लोकसंख्या २४४२१६८ आहे.

साक्षरता

२०११ च्या जनगणनेनुसार, जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ८२.८२ टक्के लोकसंख्या साक्षर आहे. जिल्ह्यातील एकूण पुरुष लोकसंख्येपैकी ८९.४१ टक्के पुरुष तर एकूण स्त्री लोकसंख्येपैकी ७५.९३ टक्के स्त्रिया साक्षर आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या तुलनेमध्ये यवतमाळ तालुका सर्वाधीक ८८.४८ टक्के साक्षरता असलेला आहे. सर्वात कमी झरी जामणी या तालुक्यातील असून ७७.७० टक्के लोकसंख्या साक्षर आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील साक्षरता ८०.४७ टक्के असून नागरी भागातील ९१.२४ टक्के लोक साक्षर आहेत. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ७२.६३ टक्के असून नागरी भागातील स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ८७.६३ टक्के आहे.

कुटुंबांची संख्या

२०११ च्या जनगणनेनुसार, यवतमाळ जिल्ह्यामध्ये एकूण कुटुंबांची संख्या ६४६८८६ आहे. त्यापैकी ७९.६९ टक्के कुटुंबे ग्रामीण भागात तर २०.३१ टक्के कुटुंबे नागरी भागात आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार, एकूण कुटुंबाची संख्या ५१८२१४ होती.

क्षेत्रवार जिल्हा उत्पन्न व दरडोई जिल्हा उत्पन्न

१) चालू किंमतीनुसार

जिल्ह्याचे क्षेत्रवार जिल्हा उत्पन्न चालू किंमतीनुसार सन २०२३-२४ करिता स्थूल जिल्हा उत्पन्न ५४८९९ कोटी रुपये आहे. मागील वर्षीच्या तुलनेत १६.८६ टक्के वाढ झालेली आहे.

२) स्थिर किंमतीनुसार (२०११-१२)

जिल्ह्याचे क्षेत्रवार जिल्हा उत्पन्न स्थिर (२०११-१२) किंमतीनुसार सन २०२३-२४ करिता स्थूल जिल्हा उत्पन्न ३२५१९ कोटी रुपये आहे. मागील वर्षीच्या तुलनेत १२.५४ टक्के वाढ झालेली आहे.

३) जिल्हा उत्पन्न अंदाजाविषयीच्या मर्यादा :

जिल्हा स्तरावरील उत्पन्नाचे अचूक अंदाज करण्यासाठी 'प्रदेशाला संचयित होणारे उत्पन्न' ही संकल्पना वापरणे योग्य असले तरी, जिल्हास्तरावरील आर्थिक उलाढालीचा परिणाम जिल्ह्यापुरताच मर्यादीत राहत नसल्याने संबंधित जिल्ह्याला बाहेरुन प्राप्त होणारे व संबंधित जिल्ह्यातून बाहेर जाणा-या उत्पन्नाचे मोजमाप करणे शक्य नसल्याने, सदर पध्दतीचा वापर करता येत नाही. त्यामुळे 'उत्पन्न स्त्रोत पध्दती (Income Originating Approach)' या संकल्पनेचा अवलंब करून जिल्हास्तरावरील उत्पन्नाचे अंदाज तयार करण्यात आलेले आहेत.

जिल्हा उत्पन्नाचे अंदाज तयार करण्याकरीता लागणारी मुलभूत माहिती अजूनही समाधानकारकरित्या उपलब्ध नाही. प्राथमिक क्षेत्राकरिता बहुतांश आकडेवारी उपलब्ध आहे. मात्र इतर क्षेत्राकरीता आकडेवारी अतिशय अल्पशा प्रमाणात उपलब्ध आहे. ज्या क्षेत्राकरिता जिल्हास्तरावरील आकडेवारी उपलब्ध नाही, त्या क्षेत्राकरिता जिल्हावार अनुरुप असे निर्देशांक वापरून त्या आधारे राज्यस्तरावरील उत्पन्नाची जिल्ह्यामध्ये विभागणी करण्यात आलेली आहे.

आकडेवारीच्या उपलब्धतेचा अभाव, अनुरूप निर्देशांकाचा वापर तसेच पध्दतीमधील अंगभूत उणीवा या सर्वांमुळे जिल्हा उत्पन्नाचे अचूक अंदाज बांधण्यामध्ये मर्यादा येत असल्याने, हे अंदाज ढोबळमानाने जिल्ह्यातील उत्पन्नाची पातळी आजमविण्याकरिता वापरावेत. या प्रकाशनात प्रकाशित केलेले जिल्हा उत्पन्नाचे अंदाज वापरतांना वरील मर्यादा लक्षात घ्याव्यात.

३. वने

भारतीय वन सर्वेक्षण अहवाल, २०२१ नुसार जिल्ह्यातील एकूण वनक्षेत्र ३०४५.२८ चौ.कि.मी. असून ते जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २२.४२ टक्के आहे. यवतमाळ जिल्ह्यात वनक्षेत्र विस्तृत प्रमाणात असल्यामुळे वन विभागाचे पूसद, यवतमाळ, पांढरकवडा असे तीन विभाग कार्यरत आहेत.

जिल्ह्यात एकूण राखीव जंगलाचे क्षेत्र २९५३.८२ चौ.कि.मी., संरक्षित वनक्षेत्र ६.३१ चौ.कि.मी. व अवर्गीकृत वनक्षेत्र ८५.१५ चौ.कि.मी. आहे. सामाजिक वनीकरणातंर्गत सन २०२४-२५ मध्ये जिल्ह्यात २३००० वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे.

वनोत्पादन

यवतमाळ व पुसद या वन विभागाच्या परिक्षेत्रात उत्तम दर्जाच्या सागवानी झाडांची वने आढळून येतात. सागवान लाकडाप्रमाणे या जिल्ह्यामध्ये सर्वसाधारण उपयोगीतेचे लाकूड जसे बांबू, तेंदू, आंबा, हिरडा इत्यादी अनेक जातींची झाडे आहेत. येथील वनात इमारती व जळाऊ लाकडाव्यतिरिक्त आपट्यांची पाने, विडीची पाने, डिंक आदींचे देखील उत्पादन होते. सन २०२४-२५ वर्षात रुपये २६०२.४१ लाख उत्पादन विविध मुख्य व गौण वन उत्पादनाच्या विक्रीपासून प्राप्त झाले आहे. त्यापैकी ४.७३ टक्के उत्पन्न विड्याच्या पानाच्या विक्रीपासून मिळाले तर इमारती व जळाऊ लाकडाच्या विक्रीपासून ९५.२५ टक्के उत्पन्न प्राप्त झाले.

जमीनीचा प्रकार

जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र १३५२ हजार हेक्टर असून त्यापैकी ३.६५ टक्के क्षेत्र बिगर शेती वापराखालील जमिनीचे आहे. पडीत आणि लागवाडीलायक नसलेली जमीन ४.४२ टक्के आहे. पडीत जमिनीव्यतिरीक्त लागवड न झालेली एकूण जमीन २.१७ टक्के आहे. लागवडीलायक क्षेत्र ७३.७८ टक्के असून त्यापैकी निव्वळ पेरलेले क्षेत्र ९१५ हजार हेक्टर म्हणजे लागवडीलायक क्षेत्राच्या ९१.७८ टक्के आहे. एकापेक्षा अधिक वेळा लागवड केलेले क्षेत्र निव्वळ पिक क्षेत्राच्या २१.२४ टक्के आहे. एकूण भौगोलिक क्षेत्राच्या १८.१५ टक्के क्षेत्र जंगल व्याप्त आहे.

वहीत धारण जमीनीचे क्षेत्रफळ, ओलीत क्षेत्र व मालकीचा प्रकार इ. नुसार वर्गीकरण

क्षेत्रफळ गट आकारमानानुसार वहीत धारण खातेदारांची संख्या व धारण क्षेत्रफळाची माहिती कृषि गणना २०१५-१६ नुसार आहे. एकूण वहीत धारण खातेदारांची संख्या ४४२५४१ एवढी असून क्षेत्रफळ ९०३०९९.६४ हेक्टर आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्था

जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये रास्त धान्य दुकाने २०४३ आहे. जिल्ह्यात एकूण ४४ गोदामे असून गोदामांची क्षमता २७३६० मे.टन आहे. अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य गटात मोडणारे (अंत्योदय अन्न योजना वगळून) योजनेतील कुटुंबांना सन २०२४-२५ वर्षात तांदळाचे नियतन ५.७० लाख मे. टन असून उचल ५.७० लाख मे.टन केलेले आहे. गव्हाचे नियतन ३.४४ लाख मे.टन असून ३.४४ लाख मे.टन उचल केलेली आहे. तांदूळ व गव्हाच्या उचलची नियतनाशी असलेली टक्केवारी अनुक्रमे १००.० व १००.० आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थाचे उत्पन्न व खर्च

ग्रामपंचायत : जिल्ह्यात एकूण १२०२ ग्रामपंचायती आहे. ग्रामपंचायतीपासून सन २०२३-२४ मध्ये मिळालेले एकूण उत्पन्न ३८४३४.४० लाख असून खर्च ३११०४.९० लाख आहे. खर्चाची उत्पन्नाशी टक्केवारी ८०.९३ इतकी आहे.

जिल्हा परिषद : यवतमाळ जिल्हा परिषदेला सन २०२२-२३ मध्ये मिळालेले एकूण उत्पन्न २८४३६३.५२ लाख असून खर्च २०००६५.५१ लाख आहे. खर्चाची उत्पन्नाशी टक्केवारी ७०.३६ इतकी आहे.

नगर परिषद : जिल्ह्यातील सर्व नगर परिषदेला मिळालेले एकूण उत्पन्न ७९२३८.०९ लाख असून खर्च ५२५९६.४६ लाख आहे. खर्चाची उत्पन्नाशी टक्केवारी ६६.३८ इतकी आहे.

नगर पंचायत : जिल्ह्यातील सर्व नगर पंचायतीला मिळणारे एकूण उत्पन्न ५२२९.३६ लाख असून खर्च २३४४.३१ लाख आहे. खर्चाची उत्पन्नाशी टक्केवारी ४४.८३ इतकी आहे.

बँकींग व विमा क्षेत्र

जिल्ह्यात वर्गीकृत बँकांची ३२० शाखा कार्यालये कार्यरत आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, यवतमाळच्या ९५ शाखा जिल्ह्यात कार्यरत असून त्यांचेकडे रुपये ३०७०९८.९८ लाख च्या ठेवी आहेत.

बचत गट

जिल्ह्यात ४८२४२ बचत गट स्थापन झालेले आहेत. पैकी खेळत्या भांडवलासाठी बँक जोडणी झालेले (फिरता निधी दिलेले) २२५७९ बचतगट असून ७६४८५ बचत गटांना बँकांमार्फत पतपुरवठा केलेला आहे. बँकामार्फत १९८७५६.५२ लाख रुपये पतपुरवठा सदर बचतगटांना करण्यात आलेला आहे.

पशुसंवर्धन विभाग

जिल्ह्यात ८ पशुचिकीत्सालये, ५८ पशुवैद्यकीय दवाखाने (राज्य तथा स्थानिक स्तर) कार्यरत असून १३५ पशुवैद्यकीय प्रथमोपचार केंद्रे आहेत.

मत्स्यव्यवसाय

जिल्ह्यात मत्स्यव्यवसायासाठी ४७८ अनुकूल तळी, सरोवरे व जलाशये असून या वर्षात ७६७१ मे. टन मत्स्य उत्पादन झालेले आहे. त्यापासून ६१३६.८० लाख रुपये उत्पादकास किंमत मिळालेली आहे. जिल्ह्यात एकूण १८४ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था आहेत.

दुग्धव्यवसाय

जिल्ह्यात एकूण ११ दुध विकास सहकारी संस्था असून सन २०२४-२५ वर्षात दुध संकलित झालेले नाही.

जलसंपदा व लाभक्षेत्र विकास

जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ एकूण १३५१९२६ हेक्टर असून त्यापैकी शेतीलायक क्षेत्र ९९७४७९ हेक्टर आहे. सिंचनासाठी जिल्ह्यात पूस, अरुणावती, बेंबळा, उर्ध्व पैनगंगा, निम्न पैनगंगा हे ५ मोठे प्रकल्प असून व सायखेडा, वाघाडी, गोखी, बोरगाव, अधरपूस, अडाण, नवरगाव, टाकळी (डोल्हारी), वर्धा बॅरेज असे ९ मध्यम प्रकल्प आहेत. जिल्ह्यात लघुसिंचन प्रकल्प - राज्यस्तर ७१, लघुसिंचन प्रकल्प - स्थानिक स्तर ९४३ व पाझर व गाव तलाव ४४३ आहेत.

रोजगार व स्वयंरोजगार

जिल्ह्यात सन २०२४-२५ या वर्षात यंत्रणेकडे उपलब्ध असलेल्या स्वयंरोजगाराच्या योजनांतर्गत जिल्हा उद्योग केंद्रामार्फत २४५० लाभधारकांना लाभ देण्यात आला. तसेच स्थानिक व विविध महामंडळामार्फत ३०२ लाभार्थींना स्वयंरोजगाराचा लाभ मिळालेला आहे. जिल्ह्यात एकूण नोंदणी झालेले कारखाने २०३ आहेत. या कारखान्यामध्ये कार्यरत असलेले एकूण कामगार ११८०४ असून त्यापैकी स्त्रियांची संख्या ६६० इतकी आहे.

जिल्ह्यात निरनिराळ्या उद्योगांतर्गत २२३७ आस्थापना असून त्यामधील कर्मचा-यांची संख्या ७४४०६ इतकी आहे.

सहकार व पणन

जिल्ह्यात एकूण १७८७ सहकारी संस्था असून पैकी ५९६ कृषि पतसंस्था, २७१ बिगर कृषि पतसंस्था, ३५ पणन संस्था, ३५७ उत्पादक सहकारी संस्था आणि ५२८ सामाजिक सेवा सहकारी संस्था कार्यरत आहेत. जिल्ह्यात १७ कृषि उत्पन्न बाजार समित्या कार्यरत असून उपबाजार समित्या २२ आहेत.

जिल्ह्यात परवानाधारक सावकारांची संख्या ११५ असून त्यांचे मार्फत ७५७.९६ लाख रुपये कर्ज देण्यात आलेले आहे.

ऊर्जा विभाग

जिल्ह्यात विद्युतीकरण झालेल्या गावांची एकूण संख्या १८७१ आहे. सन २०२४-२५ वर्षात विजेचा एकूण वापर १५४८१३३.९० हजार कि.वॅट तास होता. उर्जा वापराचे विश्लेषण केले असता, औद्योगीक कामासाठी ७५४२७.३५ हजार कि .वॅट तास, घरगुती वापरासाठी ३८५६०५.६८ हजार कि.वॅट तास, कृषि वापरासाठी ९६३१५९.१३ हजार कि .वॅट तास, व्यापारी कामासाठी ६३८१६.३२ हजार कि.वॅट तास, सार्वजनिक दिवाबत्तीसाठी ३७८८५.०६ हजार कि .वॅट तास व इतर कामासाठी २२२४०.३६ हजार कि.वॅट तास व विजेचा वापर केला आहे. जिल्ह्यात एकूण ५.८६ लाख विजेचे कनेक्शन मार्च, २०२५ पर्यंत देण्यात आलेली आहेत.

वस्त्रोद्योग विभाग

जिल्ह्यात एकूण सहकारी सुतगिरण्या ६ असून त्यांची सभासद संख्या २७.०१ हजार आहे. त्यांचे भागभांडवल रुपये १२००५.६१ लाख आहे.

प्रादेशिक परिवहन व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन

जिल्ह्यात ७०३८६३ वाहनांपैकी प्रवासी वाहने ६४१७६९ व मालवाहतूक वाहने ६२०९४ आहेत. सन २०२४-२५ या वर्षात नोंदणीकृत एकूण ४७०१८ वाहनांपैकी डिझेलची वाहने ५४११ तर पेट्रोलची वाहने ४००६८, इलेक्ट्रीक वाहनांची संख्या १४३७ व सी.एन.जी./एल.पी.जी. वाहने १०२ आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत वाहनाच्या संख्येत शेकडा ११.७१ टक्क्यांनी वाढ झालेली आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन अंतर्गत जिल्ह्यात एकूण ३५००८ कि.मी. लांबीचे मार्ग असून, अस्तित्वात असलेल्या बसगाड्याची संख्या ३७१ आहे. सन २०२४-२५ या वर्षात वाहतुकीमुळे रुपये १३४४६.७१ लाख उत्पन्न मिळालेले आहे.

टपाल व दूरध्वनी

जिल्ह्यात एकूण पोस्टांची संख्या ४०४, पत्रपेटयांची संख्या ७०७ व पोस्टमनची संख्या ५५६ आहे. वैयक्तिक दूरध्वनींची संख्या ३७२४ आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग

जिल्ह्यातील एकूण रस्त्यांची लांबी १४९४१.४१ कि.मी.आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग ३३४.७३ कि.मी., प्रमुख राज्य महामार्ग १९१.१९ कि.मी., राज्य महामार्ग ११६६.१८ कि .मी., प्रमुख जिल्हा रस्ते १८७७.४३ कि.मी., इतर जिल्हा रस्ते ४३३७.५६ कि.मी. व ७०३४.३२ कि.मी. चे ग्रामीण रस्त्यांच्या लांबीचा समावेश आहे.

पाणी पुरवठा व स्वच्छता

जिल्ह्यात एकूण २१३७ गावे आहेत. बाराही महिने पुरेसे पाणी उपलब्ध असलेल्या गावांची संख्या १४७५ असून त्याखालील वाड्या व वस्त्यांची संख्या ४३८ आहे. त्यापैकी नळाव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या गावांची संख्या १४७५ असून त्याखालील वाड्या व वस्त्यांची संख्या ४३८ आहे.

टंचाईग्रस्त गावांची संख्या ३१२ असून वाड्या व वस्त्यांची संख्या निरंक आहे. टँकरव्दारे ३९ गावांना व इतर साधनाने २७३ गावांना पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे. टंचाईग्रस्त गावांना विविध २७३ उपयोजना साधनांव्दारे पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे.

सामाजिक व सामुहीक सेवा

शिक्षण

प्राथमिक शाळा

जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या २१६० शाळा असून त्यापैकी १६ शाळा मुलींकरीता आहेत. खाजगी अनुदानीत शाळा १७७ आहेत. खाजगी विना अनुदानीत शाळा १७३ आहेत. एकूण प्राथमिक शाळा २५१० असून त्यापैकी १६ शाळा मुलींकरीता आहेत. प्राथमिक शाळांमध्ये एकूण ९१०९ शिक्षक असून २०१२२२ विद्यार्थी आहेत.

माध्यमिक शाळा

जिल्ह्यात एकूण शासकीय माध्यमिक शाळांची संख्या २४ असून त्यापैकी ३ मुलींकरीता आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांची शाळा ३२ असून यापैकी १ मुलींकरीता, खाजगी अनुदानीत शाळांची संख्या २९१ असून यापैकी ९ मुलींकरीता व खाजगी विना अनुदानीत शाळांची संख्या ९४ आहे. एकूण माध्यमिक शाळांची संख्या ४४१ असून त्यापैकी मुलींकरीता १३ शाळा आहेत. माध्यमिक शाळांमध्ये एकूण ३६४४ शिक्षक असून १०५४०१ विद्यार्थी आहेत.

उच्च माध्यमिक शाळा

जिल्ह्यात एकूण उच्च माध्यमिक शाळा ३७३ असून त्यापैकी मुलींकरिता १२ शाळा आहेत. शासकीय उच्च माध्यमिक शाळा १० असून पैकी मुलींकरिता २ शाळा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १३ शाळा आहेत. खाजगी अनुदानीत शाळा २४८ असून यापैकी मुलींकरीता १० शाळा आहेत. खाजगी विना अनुदानीत १०२ शाळा आहेत. उच्च माध्यमिक शाळांमध्ये एकूण ४६४९ शिक्षक असून १७२१३८ विद्यार्थी आहेत.

गळतीचे प्रमाण

जिल्ह्यात सन २०२४-२५ मध्ये इयत्ता ५ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण निरंक आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग

जिल्ह्यामध्ये सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने वैद्यकीय सेवा शासन, जिल्हा परिषद, नगर परिषद तसेच शासन अनुदानित संस्थांमार्फत उपलब्ध करुन दिलेली आहे. जिल्ह्यामध्ये १८ रुग्णालये, २१ दवाखाने, ८५ प्रसुतीगृहे, ६७ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ४५५ उपकेंद्रे कार्यरत आहे. वरील वैद्यकीय संस्थेत २७९ डॉक्टर व वैद्य, ९४४ परिचारीका कार्यरत आहे. रुग्णालयातील / दवाखान्यातील एकूण खाटांची संख्या १८७५ आहे. या संस्थांमधून २६४००० आंतररुग्ण व ५३३०६०० बाह्यरुग्णावर उपचार करण्यात आले. सार्वजनिक रुग्णालयात उपलब्ध असलेल्या खाटांचे दर लाख लोकसंख्येशी प्रमाण ६७ आहे.

जिल्ह्यातील एकूण कुटूंब कल्याण केंद्राची संख्या ८६ असून त्यापैकी ६७ ग्रामीण केंद्रे व १९ नागरी केंद्रे आहेत.

महिला व बालविकास विभाग

जिल्ह्यात एकूण ३०२९ अंगणवाड्या कार्यरत असून त्यापैकी २६९३ ग्रामीण तर ३३६ नागरी अंगणवाड्या आहेत. या सर्व अंगणवाडीमध्ये दाखल केलेल्या बालकांची संख्या १८१०१७ आहे.

जिल्ह्यातील ०-५ वयोगटातील एकूण मुलांची संख्या १५५८४७ आहे. त्यापैकी एकूण ४२१० मध्यम कमी वजनाची मुले असून ८१४ मुले तीव्र कमी वजनाची आहेत. त्यांची एकूण मुलांशी टक्केवारी अनुक्रमे २.७० % व ०.५२ % आहे.

सामाजिक न्याय विभाग

मागासवर्गीयांची वसतीगृहे

जिल्ह्यात एकूण १९२ मागासवर्गीय वसतीगृहे कार्यरत आहेत. त्यापैकी १८ शासकीय व १७४ अनुदानित वसतीगृहे आहेत. शासकीय वसतीगृहामध्ये १३४७ विद्यार्थी व अनुदानित वसतीगृहामध्ये ८३३६ विद्यार्थ्यांना सन २०२४-२५ वर्षामध्ये प्रवेश देण्यात आलेला आहे.

विशेष सहाय्य

जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजनेंतर्गत ६२२४० लाभार्थींना अनुदान वाटप करण्यात आले. श्रावणबाळ सेवा योजनेंतर्गत १०२५४८ लाभार्थींना अनुदान वाटप करण्यात आले. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ योजनेंतर्गत ३६६२७ लाभार्थी व राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेंतर्गत ११६२ लाभार्थींना अनुदान वाटप करण्यात आले.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जिल्ह्यात सन २०२४-२५ वर्षात ४५६९७ कामे पूर्ण झालेली असून या कामावर २६१५२.०४ लाख रुपये खर्च झालेला आहे.

पशुगणना

पशुगणना २०१९ च्या आकडेवारीनुसार, जिल्ह्यातील एकूण पशुधनाची संख्या १०५९०१७ एवढी आहे. पशुगणनेत विविध जातीचे पशुधनाची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

गायी व बैल ५६.२९ %, म्हशी व रेडे ८.३५ %, मेंढ्या २.१३ %, बक-या ३३.०५ %, घोडे, शिंगरे व खेचरे ०.०३ %, गाढवे ०.०२ % व इतर पशुधन ०.१३ % आहे. सदर गणनेनुसार, एकूण कुक्कुटपक्ष्यांची संख्या ८८६७८४ इतकी आहे.

आर्थिक गणना

२०१३ च्या सहाव्या आर्थिक गणनेनुसार, जिल्ह्यात एकूण २७५९ कृषि आस्थापना व ६५४१५ बिगर कृषि आस्थापना आहेत.

दृष्टीक्षेपात जिल्हा

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २०२५
दृष्टीक्षेपात जिल्हा

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
एक	**प्राकृतिक रचना**			
१	भौगोलिक स्थान		२०२४-२५	
१.१	उत्तर अक्षांश	अंश	१९°२६'- २०°४२'	१६°४'- २२°१'
१.२	पूर्व रेखांश	अंश	७७°१८'- ७९°९८'	७२°६'- ८०°९'
१.३	क्षेत्रफळ	हजार चौ. कि.मी.	१४	३०८
२	प्रशासकीय रचना		२०२४-२५	२०११
२.१	तालुके	संख्या	१६	३५५ $
२.२	शहरे (गणना शहरांसह)	संख्या	१८	५३४
२.३	वस्ती असलेली गावे	संख्या	१८५३	४०,९५९
२.४	वस्ती नसलेली गावे	संख्या	२८४	२,७०६
$ मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयांमधील ३ तालुके वगळून				
दोन	**स्थानिक स्वराज्य संस्था**		२०२४-२५	२०२४-२५ *
१	महानगरपालिका	संख्या	०	२९
२	नगरपरिषदा	संख्या	१०	२४७
३	नगरपंचायत	संख्या	७	१४७
४	कटकमंडळे	संख्या	०	७
५	पंचायत समित्या	संख्या	१६	३५१
६	ग्रामपंचायती	संख्या	१२०१	२७,७८२
* राज्य निवडणुक आयोग यांच्या अहवालानुसार				
तीन	**लोकसंख्या**		जनगणना २०११	२०११
१	ग्रामीण	हजार	२१७४	६१,५५६
२	नागरी	हजार	५९८	५०,८१८
३	एकूण	हजार	२७७२	१,१२,३७४
४	पुरुष	हजार	१४२०	५८,२४३
५	स्त्रिया	हजार	१३५२	५४,१३१
६	स्त्री- पुरुष प्रमाण (स्त्रिया प्रती हजार पुरुष)	संख्या	९५२	९२९
७	अनुसूचित जातींची लोकसंख्या	हजार	३२९	१३,२७६
७.१	एकूण लोकसंख्येशी प्रमाण	टक्के	११.९	११.८
८	अनुसूचित जमातींची लोकसंख्या	हजार	५१४	१०,५१०
८.१	एकूण लोकसंख्येशी प्रमाण	टक्के	१८.५	९.४
९	लोकसंख्येची घनता (प्रति चौ.कि.मी.)	संख्या	२०४	३६५
१०	साक्षरतेचे प्रमाण		जनगणना २०११	२०११
१०.१	ग्रामीण	टक्के	८०.५	७७.०१
१०.२	नागरी	टक्के	९१.२	८८.६९

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१०.३	एकूण	टक्के	८२.८	८२.३४
१०.४	पुरुष	टक्के	८९.४	८८.३८
१०.५	स्त्रिया	टक्के	७५.९	७५.८७
१०.६	साक्षरतेमध्ये महाराष्ट्राचा देशात क्रमांक	क्रम संख्या	एकवीस	बारा
			२००२	
११	दारिद्रय रेषेखालील ग्रामीण कुटुंबे	लाख	२.३०	४५.१९
चार	**जिल्हा उत्पन्न अंदाज**			
१	चालू किंमतीनुसार		२०२३-२४	२०२३-२४
१.१	एकूण उत्पन्न (स्थूल)	₹ कोटी	५४८९९	४०५५८४७
१.२	दरडोई उत्पन्न (स्थूल)	₹	१८१२७९	३१९४७४
१.३	एकूण उत्पन्न (निव्वळ)	₹ कोटी	४८४८१	३५३७९६८
१.४	दरडोई उत्पन्न (निव्वळ)	₹	१६००८८	२७८६८१
२	स्थिर (२०११-१२) किंमतीनुसार		२०२३-२४	२०२३-२४
२.१	एकूण उत्पन्न (स्थूल)	₹ कोटी	३२५१९	२४३५२५९
२.२	दरडोई उत्पन्न (स्थूल)	₹	१०७३७९	१९१८२२
२.३	एकूण उत्पन्न (निव्वळ)	₹ कोटी	२८४७४	२१०७५९७
२.४	दरडोई उत्पन्न (निव्वळ)	₹	९४०२५	१६६०१३
पाच	**वित्तीय समावेश**			
१	प्रधानमंत्री जनधन योजना		मार्च, २०२५ अखेर	२०२४-२५
१.१	उघडण्यात आलेली एकूण खाती	संख्या	१२२१९०३	३६३९२४२४
१.२	देण्यात आलेली एकूण रूपे कार्ड	संख्या	८५७५६४	२५६१५४४१
१.३	किमान शिल्कीची मर्यादा नसलेली खाती	संख्या	२१०१६२	२८६७३४८
१.४	एकूण ठेवी	₹ लाख	३९८४४	१८०१०५३
२	प्रधानमंत्री मुद्रा योजना			२०२४-२५
२.१	शिशु			
१	मंजूर कर्ज	₹ कोटी	५१७	८८८०.५२
२	वितरीत कर्ज	₹ कोटी	५१५	८८५७.५६
३	लाभार्थी	संख्या	१४२२१९	२४६०२०८
२.२	किशोर			
१	मंजूर कर्ज	₹ कोटी	८२८	२२०२७.२८
२	वितरीत कर्ज	₹ कोटी	८०१	२१७६२.८५
३	लाभार्थी	संख्या	८८४९०	१७८०७६६
२.३	तरूण			
१	मंजूर कर्ज	₹ कोटी	२३१	२०४०४.१
२	वितरीत कर्ज	₹ कोटी	२२१	२०१४१.६१
३	लाभार्थी	संख्या	२९५६	२२१८१७

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
२.४	एकूण			
१	मंजूर कर्ज	₹ कोटी	१५७६	५१३११.९
२	वितरीत कर्ज	₹ कोटी	१५३७	५०७६२.०२
३	लाभार्थी	संख्या	२३३६६५	४४६२७९१
^ तरूण व तरूण प्लस एकत्रित माहिती				
सहा	**कृषि**		२०२४-२५*	२०२४-२५
१	भौगोलिक क्षेत्र	हजार हेक्टर	१३५२	३०७५८.२
२	वनक्षेत्र	हजार हेक्टर	२४५	५१६२.९
३	वनक्षेत्राचे भौगोलिक क्षेत्राशी प्रमाण	टक्के	१८	१६.७८
४	शेतीला उपलब्ध नसलेली जमीन		२०२४-२५*	२०२३-२४
४.१	बिगर- शेती वापराखालील जमीन	हजार हेक्टर	४९	१७७२
४.२	पडीत आणि लागवाडीलायक नसलेली जमीन	हजार हेक्टर	६०	१९८४.९
४.३	एकूण	हजार हेक्टर	१०९	३७५६.९
५	पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न केलेली इतर जमीन		२०१४-१५	२०२३-२४
५.१	कायमची कुरणे व चराउ कुरणे	हजार हेक्टर	३५	१४४९.२
५.२	झाडे-झुडपांखालील	हजार हेक्टर	१५	२७६.१
			२०२४-२५*	
५.३	लागवडीलायक परंतु पडीत	हजार हेक्टर	२९	१०११.२
६	पडीत जमीन		२०२४-२५*	२०२३-२४
६.१	चालू पड	हजार हेक्टर	२५	१५२९.६
६.२	इतर पड	हजार हेक्टर	२८	१२१७.५
७	पिकांखालील क्षेत्र		२०२४-२५*	२०२३-२४
७.१	निव्वळ पेरणी क्षेत्र	हजार हेक्टर	९१५	१६३५४.३
७.२	दुसोटा /तिसोटा क्षेत्र	हजार हेक्टर	१९४	८३१३.१
७.३	एकूण पिकांखालील क्षेत्र	हजार हेक्टर	१११०	२४६६६७.३
८	ओलिताखालील क्षेत्र / सिंचनाखालील क्षेत्र			
८.१	निव्वळ ओलित क्षेत्र	हजार हेक्टर	१४३	उ.ना
८.२	एकूण ओलित क्षेत्र	हजार हेक्टर	३३८	उ.ना
* अस्थायी				
९	महत्वाच्या पिकांखालील क्षेत्र		२०२४-२५*	२०२४-२५ *
९.१	तृणधान्ये	हजार हेक्टर	६९	६९५३.०८७
९.२	कडधान्ये	हजार हेक्टर	२३५	४९७९.०९
९.३	तेलबिया	हजार हेक्टर	२८३	३११.९७
९.४	ऊस(तोडणीक्षेत्र)	हजार हेक्टर	१५	११६७.०४३
९.५	कापूस (रुई)	हजार हेक्टर	४८४	३९६३.०४२
* तृतीय पुर्वानुमानानुसार				

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
			२०२४-२५	२०२४-२५
१०	पर्जन्य (सरासरी)	मि.मी.	९८४.४	१०७५.३
११	वहितीचे क्षेत्र		२०१५-१६	२०१५-१६
११.१	क्षेत्र २ हेक्टरपेक्षा कमी	हजार हेक्टर	२९८	९,२२०
११.२	क्षेत्र २ ते १० हेक्टर	हजार हेक्टर	५५५	१०,१२५
११.३	क्षेत्र १० हेक्टरपेक्षा जास्त	हजार हेक्टर	५१	१,१६२
सात	**अंशत: व पूर्णत:सिंचन क्षमता निर्माण झालेले पाटबंधारे प्रकल्प व त्यांखालील क्षेत्र**		२०२४-२५	२०२२-२३*
१	मोठे पाटबंधारे प्रकल्प (मध्यम पाटबंधारे प्रकल्पांसह)	संख्या	५	८६
१.१	लाभक्षेत्र (निर्मित सिंचन क्षमता) (मध्यम पाटबंधारे प्रकल्पांसह)	हजार हेक्टर	३०९	३,१९४
२	मध्यम पाटबंधारे प्रकल्प	संख्या	९	२९८
२.१	लाभक्षेत्र (निर्मित सिंचन क्षमता)	हजार हेक्टर	६५	१,०००
३	लघु पाटबंधारे प्रकल्प (राज्यक्षेत्र)	संख्या	१०१४	३,३१३
३.१	लाभक्षेत्र (निर्मित सिंचन क्षमता)	हजार हेक्टर	७४	१,३६७
४	लाभ क्षेत्रातील विहिरींद्वारे सन २०१९-२० मधील सिंचन क्षेत्र	हजार हेक्टर	उ.ना.	१,३८६
* अस्थायी				
आठ	**पशुसंवर्धन**		पशुगणना २०१९	२०१९
१	एकूण पशुधन	हजार	१०५९	३३,०८०*
२	गो जातीय	हजार	५९६	१३,९९३
३	महिषवर्गीय	हजार	८८	५,६०४
४	मेंढ्या व शेळ्या	हजार	३७३	१३,२८५
५	कुक्कुटादी पक्षी	हजार	८८७	७४,२९८@ ^
६	एकूण दुग्ध उत्पादन	हजार लिटर	०	१५,०४२
* इतर पशुधनासह (इतर पशुधन या बाबीमध्ये डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, उंट व गाढवे यांचा समावेश करण्यात आला आहे.)				
@ कुक्कुटादी पक्षी यामध्ये टर्की, क्वेल व इतर कुक्कुटपक्षी यांचाही समावेश करण्यात आला आहे.				
^ एकूण कुक्कुटादी पक्षी यांच्या संख्येमध्ये पोल्ट्रीफॉर्म मधील पक्षी समाविष्ट आहेत.				
नऊ	**सहकार क्षेत्र**		२०२४-२५	२०२३-२४
१	सहकारी संस्था	संख्या	१७८७	२२२,१५४
२	प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था	संख्या	५०२	२०,९६२
२.१	सभासद संख्या	हजार	३६५	६०,०००
२.२	दिलेली कर्जे	₹ लाख	६५४४०	१,८६०,७९०
२.३	येणे कर्जे	₹ लाख	६४७२५	२,१५७,४३०
३	सहकारी दुग्धसंस्था (संदर्भ वर्ष, ३१ मार्च अखेर)	संख्या	११	१३,६३५
दहा	**वीज**		२०२४-२५	मार्च २०२४
१	विद्युतीकरण झालेली गावे	संख्या	१८७१	४१,९२३*
२	वीज पुरवठा केलेले कृषी पंप संच	हजार	८६	४,८६९
* अमरावती जिल्ह्यातील ५ गावे पुनर्वसित झाली आहेत.				

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
३	विजेचा वापर		मार्च, २०२५ अखेर	२०२४-२५
३.१	घरगुती	दशलक्ष कि.वॅ.तास	३८५.६०	३७,२११
३.२	वाणिज्यिक	दशलक्ष कि.वॅ.तास	६३.८२	१६,३०२
३.३	औद्योगिक	दशलक्ष कि.वॅ.तास	७५.४३	६५,४५९
३.४	कृषि	दशलक्ष कि.वॅ.तास	९६३.१६	३८,४२८
३.५	इतर (रेल्वे,सार्व.पाणी पुरवठा, सार्व. दिवाबत्ती व संकीर्ण)	दशलक्ष कि.वॅ.तास	६०.१२	८,८२५
३.६	एकूण	दशलक्ष कि.वॅ.तास	१५४८.१३	१६६,२२५
अकरा	**परिवहन व दळणवळण**		२०२४-२५	मार्च २०२४ अखेर
१	रेल्वे मार्गाची एकूण लांबी	कि.मी.	उ.ना.	६,३११ $
$ कोकण रेल्वेच्या लांबीसह				
२	रस्त्यांनी जोडलेली गावे		२०२४-२५	मार्च २०२१ अखेर
२.१	बारमाही	संख्या	१९१९	४०,१२२
२.२	हंगामी	संख्या	२	३७४
३	रस्त्यांची लांबी (पृष्ठांकित)		मार्च, २०२५ अखेर	२०२४-२५
३.१	राष्ट्रीय महामार्ग	कि.मी.	३३४.७३	१८,३६६
३.२	राज्य महामार्ग (प्रमुख राज्य महामार्गासह)	कि.मी.	१३१२.०७	३३,६१४
३.३	प्रमुख जिल्हामार्ग	कि.मी.	१९५१.९९	७४,१७८
३.४	इतर जिल्हामार्ग	कि.मी.	४४३२.३८	४३,२२९
३.५	ग्रामीण रस्ते	कि.मी.	७०३४.३२	१५९,१३९
३.६	एकूण	कि.मी.	१५०६५.४९	३२८,५२६
बारा	**नोंदणीकृत कारखाने व रोजगार**		२०२४-२५	२०२४-२५
१	नोंदणीकृत कारखाने	संख्या	२०३	३९,५४१
२	नोंदणीकृत चालू कारखाने	संख्या	१९६	३८,२५०
२.१	त्यांतील कामगार	संख्या	११८०४	३,४७४,२६०
			२०२४-२५	३१मार्च २०२४
३	नोंदणीकृत सहकारी साखर कारखाने	संख्या	१	१७२
३.१	साखरेचे उत्पादन	लाख मे. टन	०.९६	११०.१८
			२०२४-२५	३१मार्च २०२४
४	सहकारी सूत गिरण्या	संख्या	६	२१२
तेरा	**शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष (०१ जुलै, २०२४ रोजी भरलेली पदे)**		१ जुलै २०२४	१ जुलै २०२४
१	शासकीय	हजार	१६	७२४
चौदा	**शिक्षण क्षेत्र**		२०२४-२५	२०२४-२५
१	प्राथमिक शिक्षण (१ ते ८ वी)			
१.१	एकूण शाळा	संख्या	२५१०	१०४,४९९
१.२	विद्यार्थी	हजार	२०१	१४,५०१
१.३	शिक्षक	हजार	९	४९१
१.४	विद्यार्थी-शिक्षक प्रमाण	संख्या	२२	३०

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
२	माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण (९ ते १२)			
१.१	एकूण शाळा	संख्या	८१४	२८,९८६
१.२	विद्यार्थी	हजार	२७७	६,३६२
१.३	शिक्षक	हजार	८	२४६
१.४	विद्यार्थी-शिक्षक प्रमाण	संख्या	३३	२६
३	उच्च शिक्षण			
३.१	संस्था	संख्या	९९	४,२८८
३.२	एकूण विद्यार्थी	हजार	२१	१,०४०
४	तांत्रिक व व्यवसाय शिक्षण			
४.१	व्यवसाय पदवी शिक्षण संस्था	संख्या	१२	१००७
४.१	प्रवेश क्षमता	संख्या	१९८०	२१०,२६६
४.२	व्यवसाय पदविका शिक्षण संस्था	संख्या	उ.ना.	१०८२
४.२	प्रवेश क्षमता	संख्या	उ.ना.	१५४९८७
४.३	शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था	संख्या	१८	४१९
४.३	प्रवेश क्षमता	संख्या	४३८०	९३,५३६
४.४	अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (विना अनुदानित)	संख्या	४	५८८
४.४	प्रवेश क्षमता	संख्या	३१६	५९,५२४
पंधरा	**सार्वजनिक आरोग्य**		२०२४-२५	डिसेंबर २०२४
१	रुग्णालये	संख्या	१८	५१७
२	दवाखाने	संख्या	२१	८५१
३	प्राथमिक आरोग्य केंद्रे	संख्या	६७	१,९३६
४	प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे	संख्या	४५५	१०,७६५
५	प्राथमिक आरोग्य पथके	संख्या	१	१२१
सोळा	**आदिवासी कल्याणकारी योजना**		२०२४-२५	२०२४-२५
१	आदिवासी आश्रमशाळा (शासकीय व अनुदानित)	संख्या	६५	१,०५१
२	त्यांतील विद्यार्थी	संख्या	२३५७०	४५६,४४७
सतरा	**मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना**		२०२४-२५	२०२४-२५
१	मागासवर्गीयांसाठी वसतिगृहे (शासकीय व अनुदानित)	संख्या	१९२	२,८२९
२	त्यांतील विद्यार्थी	संख्या	९६८३	१४२,१२५
अठरा	**सार्वजनिक वितरण व्यवस्था**		२०२४-२५	जून २०२४ अखेर
१	रास्त भावाची दुकाने	संख्या	२०४३	५१,६७३
२	पुरविलेला एकूण साठा		२०२४-२५	ऑक्टोबर २०२४
२.१	गहू	लाख टन	३	१३८०२
२.२	तांदूळ	लाख टन	६	२४४०२
			२०२४-२५	ऑक्टोबर २०२४
३	शासकीय गोदामे	संख्या	४४	१,१८६
४	साठवण क्षमता	हजार टन	२७	८३४,७६०

जिल्हा योजनेचा आढावा

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन मार्च - २०२५

जिल्हा योजनेचा आढावा

जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५

सर्वसाधारण योजना :

जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेंतर्गत सन २०२४-२५ या वर्षासाठी मंजूर नियतव्यय रुपये ४७२००.०० लाख आहे. माहे-मार्च, २०२५ अखेर रुपये ४७२००.०० लाख खर्च झालेला असून मंजूर नियतव्ययाशी खर्चाची टक्केवारी १०० % एवढी आहे.

सन २०२५-२६ वर्षाकरिता जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेचा मंजूर नियतव्यय रुपये ५२८००.०० लाख आहे.

अनुसूचित जाती उपयोजना :

जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत सन २०२४-२५ या वर्षासाठी मंजूर नियतव्यय रुपये ८४००.०० लाख आहे. माहे-मार्च, २०२५ अखेर रुपये ८४००.०० लाख खर्च झालेला असून मंजूर नियतव्ययाशी खर्चाची टक्केवारी १०० % एवढी आहे.

सन २०२५-२६ वर्षाकरिता जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजनेकरीता मंजूर नियतव्यय रुपये ८४००.०० लाख आहे.

आदिवासी उपयोजना :

जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनांतर्गत सन २०२४-२५ या वर्षासाठी मंजूर नियतव्यय रुपये ९२९१.४७ लाख आहे. माहे-मार्च, २०२५ अखेर रुपये ९२२३.६८ लाख खर्च झालेला असून मंजूर नियतव्ययाशी खर्चाची टक्केवारी ९९.२७ % एवढी आहे.

सन २०२५-२६ वर्षाकरिता जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेकरीता मंजूर नियतव्यय रुपये १००२६.०० लाख आहे.

आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजना :

जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनेंतर्गत सन २०२४-२५ या वर्षात मंजूर नियतव्यय रुपये ३१८९.७७ लाख आहे. माहे-मार्च, २०२५ अखेर रुपये ३०७२.२२ लाख खर्च झालेला असून मंजूर नियतव्ययाशी खर्चाची टक्केवारी ९६.३१ % एवढी आहे.

सन २०२५-२६ वर्षाकरिता जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनेकरीता मंजूर नियतव्यय रुपये ४२१२.३० लाख आहे.

डोंगरी विकास कार्यक्रम :

डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२४-२५ या वर्षाकरीता मंजूर नियतव्यय रुपये ३००.०० लाख असून प्राप्त निधी रुपये २१०.०० लाख आहे. माहे-मार्च, २०२५ अखेर पर्यंत रुपये १७५.५८ लाख खर्च झालेला आहे. खर्चाची टक्केवारी ८१.२३ % एवढी आहे.

सन २०२५-२६ वर्षाकरिता डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत रुपये ३००.०० लाख नियतव्यय मंजूर आहे.



आधार : महानिबंधक व जनगणना आयुक्त कार्यालय, भारत सरकार

जिल्हा सामाजिक व आर्थिक
समालोचन - २०२५
यवतमाळ जिल्हा
निवडक आलेख

आलेख क्र. १
जिल्ह्यातील लोकसंख्या (जनगणना २०११ नुसार)



आलेख क्र. २

जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्येचे प्रमाण (जनगणना २०११ नुसार)



आलेख क्र. ३
जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण (जनगणना २०११ नुसार)



आलेख क्र. ४

जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण (जनगणना २०११ नुसार)

दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या



आलेख क्र. ५

जिल्ह्यातील अनुसूचित जाती/जमातीच्या लोकसंख्येची तहसीलनिहाय टक्केवारी (जनगणना २०११ नुसार)

अनुसूचित जाती/जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी



जिल्हा सामाजिक व आर्थिक
समालोचन - २०२५
भाग २ :
सांख्यिकीय तक्ते

निवडक निर्देशक

तक्ता क्र १.१ अ

जिल्ह्यातील विविध आर्थिक व सामाजिक बाबींचे निवडक निर्देशक

जिल्हा : यवतमाळ **संदर्भ कालावधी : १९६०-६१ ते २०२४-२५**

अ.क्र.	बाब	परिमाण	संदर्भ वर्ष			
			१९६०-६१	१९७०-७१	१९८०-८१	१९९०-९१
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
क्षेत्रफळ व लोकसंख्या						
१	क्षेत्रफळ	क्षेत्र चौ.कि.मी.	१३५१७	१३९२५	१३५८४	१३५८४
२	तालुके	संख्या	५	५	५	१४
३	गावे : वस्ती असलेली गावे	संख्या	१६२९	१६४७	१७५१	१८३६
४	गावे : वस्ती नसलेली गावे	संख्या	२९५	२८४	२५४	२७२
५	शहरे	संख्या	८	८	८	१०
६	एकूण लोकसंख्या	हजार	१०९८	१४२४	१७३७	२०७७
७	लोकसंख्येचे प्रमाण : शहरी	टक्के	१२.६	१३.६	१५.१	१७.२
८	लोकसंख्येचे प्रमाण : ग्रामिण	टक्के	८७.४	८६.३	८४.९	८२.८
९	लोकसंख्येची घनता (प्रति चौ. कि.मी.) : शहरी	संख्या	उ.ना.	उ.ना.	उ.ना.	उ.ना.
१०	लोकसंख्येची घनता (प्रति चौ. कि.मी.) : ग्रामिण	संख्या	८२	१०२	१२८	१५३
११	स्त्री-पुरुष प्रमाण (स्त्रिया प्रती हजार पुरुष)	संख्या	९७२	९६०	९५८	९५१
साक्षरतेचे प्रमाण						
१२	पुरुष	टक्के	३५.३	४२.९	५१.३	७०.४
१३	स्त्रिया	टक्के	११.३	१९.९	२६.९	३७.७
१४	एकूण	टक्के	२३.५	३१.६	३९.३	५८.०
१५	ग्रामीण	टक्के	२०.३	२८.४	३५.५	५३.७
१६	नागरी	टक्के	४५.५	-	-	७७.८
१७	अनुसुचित जाती	टक्के	उ.ना.	उ.ना.	उ.ना.	उ.ना.
१८	अनुसुचित जमाती	टक्के	उ.ना.	उ.ना.	उ.ना.	उ.ना.
स्थानिक स्वराज्य संस्था						
१९	महानगरपालिका	संख्या	०	०	०	०
२०	नगरपरिषदा	संख्या	८	८	८	८
२१	नगरपंचायती	संख्या	०	०	०	०
२२	कटक मंडळे	संख्या	०	०	०	०
२३	पंचायत समित्या	संख्या	१४	१४	१४	१४
२४	ग्राम पंचायती	संख्या	१०३१	१११४	११२४	११५२
क्षेत्रवार जिल्हा व दरडोई उत्पन्न (चालू किंमतींनुसार)						
२५	निव्वळ जिल्हा उत्पन्न	₹ कोटी	-	-	-	-
२६	निव्वळ दरडोई उत्पन्न	रूपये	-	-	-	-
२७	राज्याच्या उत्पन्नात जिल्ह्याचा हिस्सा	टक्के	-	-	-	-

तक्ता क्र १.१ अ

जिल्ह्यातील विविध आर्थिक व सामाजिक बाबींचे निवडक निर्देशक

जिल्हा : यवतमाळ **संदर्भ कालावधी : १९६०-६१ ते २०२४-२५**

अ.क्र.	बाब	परिमाण	संदर्भ वर्ष				
			२०००-०१	२०१०-११	२०२०-२१	२०२३-२४	२०२४-२५
(१)	(२)	(३)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)
क्षेत्रफळ व लोकसंख्या							
१	क्षेत्रफळ	क्षेत्र चौ.कि.मी.	१३५८४	१३५८२	१३५८२	१३५८२	१३५८२
२	तालुके	संख्या	१६	१६	१६	१६	१६
३	गावे : वस्ती असलेली गावे	संख्या	१८५६	१८५३	१८५३	१८५३	१८५३
४	गावे : वस्ती नसलेली गावे	संख्या	२७४	२८४	२८४	२८४	२८४
५	शहरे	संख्या	१३	१८	१८	१८	१८
६	एकूण लोकसंख्या	हजार	२४५८	२७७२	२७७२	२७७२	२७७२
७	लोकसंख्येचे प्रमाण : शहरी	टक्के	१८.६	२१.६	२१.६	२१.६	२१.६
८	लोकसंख्येचे प्रमाण : ग्रामिण	टक्के	८१.४	७८.४	७८.४	७८.४	७८.४
९	लोकसंख्येची घनता (प्रति चौ. कि.मी.) : शहरी	संख्या	६७२३	३५८४	३५८४	३५८४	३५८४
१०	लोकसंख्येची घनता (प्रति चौ. कि.मी.) : ग्रामिण	संख्या	१४८	१६२	१६२	१६२	१६२
११	स्त्री-पुरुष प्रमाण (स्त्रिया प्रती हजार पुरुष)	संख्या	९४२	९५२	९५२	९५२	९५२
